# सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग

प्रधान कार्यालय, सिंधुदुर्गनगरी
फोन नं. ०२३६२- २२९००५ ते २२९०१० ई मेल - sindhudurgdcc@gmail.com

जा.क्र. कर्ज/९९९/३१/एल.ए. २९९/३६४५/२०१३-१४ दि. ०१/०१/२०१४

## -: परिपत्रक १८ :-

**विषय :-** सन २०१४-१५ करीता अल्प मुदत पिक कर्ज प्रमाण व कर्ज वाटप धोरणातील सुधारणा.

आपल्या जिल्हयातील पिकदर निश्चित करणेकरीता जिल्हा स्तरीय तांत्रिक समिती सभा दि. २५.११.२०१३ रोजी घेण्यात आली. सदर समितीने केलेल्या शिफारशींबाबत मा. संचालक मंडळ सभा दि. ३०.११.२०१३ मधील निर्णयानुसार सन २०१४-१५ करीता खालील प्रमाणे पिक प्रमाणदर व मा. संचालक मंडळ सभा दि. २७.१२.२०१३ मधील निर्णयानुसार अल्प पिक कर्ज वाटप सुधारीत धोरण खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

**अ) सन २०१४ -१५ करीता पिक प्रमाण दर** (रक्कम रूपयात)

| तपशिल | | | सन २०१३-१४ | सन २०१४-१५ |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पिकाचा प्रकार** | **हंगाम** | **पिक प्रमाण दर** | **पिक प्रमाण दर** |
| | **अन्नधान्ये व कडधान्ये** | | | |
| १ | भातशेती | खरीप व रब्बी | | |
| | भातपीक साधे | | २०००० | २५००० |
| | बहुउत्पादन/सधन | | ३२००० | ४०००० |
| २ | बासमती भात | खरीप | ३५००० | ५०००० |
| ३ | नागली | खरीप, रब्बी | १०००० | ३०००० |
| ४ | गहू-जिरायत | रब्बी | २०००० | २५००० |
| ५ | संकरित मका | रब्बी | २२००० | २५००० |
| ६ | संकरित ज्वारी | रब्बी | २०००० | २२००० |
| ७ | ऊस | आडसाली/ पूर्व हंगाम | ७५००० | ९०००० |
| | | सुरू | ७५००० | ८०००० |
| | | खोडवा | ५०००० | ७५००० |
| ८ | भुईमूग | खरीप, रब्बी | ३०००० | ३०००० |
| ९ | कडधान्य | रब्बी | २०००० | २५००० |
| १० | हरभरा (बागायत) | रब्बी | २०००० | २३००० |
| | हरभरा (जिरायत) | रब्बी | १५००० | १९००० |
| ११ | गहू (बागायत) | रब्बी | २५००० | २६००० |
| १२ | सुर्यफूल/सोयाबीन | खरीप, रब्बी | २७००० | ३०००० |
| १३ | कुळीथ | रब्बी | २०००० | २०००० |
| १४ | उडीद/ मूग वैशाखी | खरीप | १५००० | १६००० |
| | **भाजीपाला पीके** | | | |
| १५ | मिर्ची | रब्बी | ४०००० | ५६००० |
| १६ | बटाटा | रब्बी | ५५००० | ५६००० |
| १७ | कारली | खरीप | ३०००० | ५६००० |
| १८ | वाल | रब्बी | २५००० | ३०००० |
| १९ | हळद, आले | रब्बी | १००००० | १००००० |
| २० | कांदा | | ५०००० | ५६००० |
| २१ | लसूण | | ३०००० | ३०००० |
| २२ | वांगी,भेंडी,काकडी, पडवळ, घेवडा व इतर भाजीपाला | रब्बी | ३०००० | ४०००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **बागायती पीके** | | | |
| २३ | कलमी आंबा उत्पादन कर्ज (१०० कलम प्रति हेक्टरी) रू.१३००/- प्रति झाड | संस्था वैय.थेट | १३०००० | १३०००० |
| २४ | सुपारी (१२५० रोपे प्रति हेक्टरी) रू.१००/- प्रतिझाड | | १२५००० | १२५००० |
| २५ | अननस पहिले पीक | | | |
| | रोपे १०००० | | ५०००० | ५०००० |
| | रोपे १५००० | | ७५००० | ७५००० |
| | अननस दुसरे पीक | | | |
| | रोपे १०००० | | १५००० | १५००० |
| | रोपे १५००० | | २०००० | २०००० |
| २६ | केळी (आंतरपीकासह १६०० रोपे) | | ९०००० | १००००० |
| २७ | नारळ (१७५ रोपे प्रति हेक्टरी) | | ९०००० | ९०००० |
| २८ | रतांबे (कोकम) | | १५००० | १५००० |
| २९ | काजू (२०० रोपे प्रति हेक्टरी) रू. ४००/- प्रति झाड | | ७५००० | ८०००० |
| ३० | काळी मिरी (१० गुंठे) (११० वेली) | | ७००० | १०००० |
| ३१ | कलिंगड | | ५०००० | ५०००० |
| ३२ | चिकू (१०० रोपे हेक्टरी) | | ३५००० | ४५००० |
| ३३ | पेरू | | ३५००० | ४५००० |
| ३४ | पपई | | २०००० | ५०००० |
| ३५ | बांबू उत्पादन कर्ज (प्रति बेट रू.१००/-) | | १००००० | १००००० |
| ३६ | रबर लागवड उत्पादन | | ५५००० | ५५००० |
| ३७ | ऑईल पाम उत्पादन | | ४०००० | ४०००० |
| ३८ | आवळा पिक उत्पादन (हेक्टरी १०० झाडे) | | ३०००० | ३०००० |
| ३९ | स्ट्रॉबेरी (८००० प्रती गुंठा) | | ८००००० | ८००००० |
| | **फुलपिके** | | | |
| ४० | झेंडू, ॲस्टर, शेवंती फुले | | ३०००० | ३०००० |
| ४१ | मोगरा लावगड | | ४५००० | ४५००० |
| ४२ | गुलाब | | .. | ४०००० |
| | **चारा पिके** | | | |
| ४३ | गजराज, मका | .. | .. | ३०००० |
| ४४ | लसून, पवना गवत | .. | .. | ६०००० |
| ४५ | बाजरी (हिरवा चारा) | .. | .. | १५००० |
| ४६ | ज्वारी (हिरवा चारा) | .. | .. | २०००० |

## ब) सुधारित पिक कर्ज वाटप धोरण –

अल्प मुदत शेती पिक कर्ज वाटपामध्ये प्रतिवर्षी वाढ होत असून, चालू वर्षी पिक कर्ज वाटप रू. ९४ कोटी झालेले असून गतवर्षीच्या तुलनेत १५% वाढ झालेली आहे. मात्र जिल्हयातील प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्रात घट होत असून, सवलतीच्या व्याजदराने उपलब्ध होणाऱ्या पिक कर्ज वितरणात संस्था पातळीवर मोठ्याप्रमाणात वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

याबाबत नाबार्डने दि. १५.११.२०१३ तसेच कृषी मंत्रालयाने दि. १२.११.२०१३ व रिझर्व्ह बँकेने दि. ९.११.२०१३ ने याबाबत पुढीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत. *अल्प मुदत पिक कर्जाच्या*

*बाबतीत, केंद्र व राज्य शासनाच्या व्याज सवलत योजनेमुळे वाढ होत असताना काही प्रस्तावांमध्ये सदर कर्जाचा गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. बऱ्याच ठिकाणी पिक कर्जाचा पिक उत्पादन वाढीसाठी वापर न होता, सवलतीचे कर्ज वेगळया कारणांसाठी वापरले जात आहे. बँकांमध्ये ठेवी स्वरूपात किंवा अन्य जादा व्याजदराच्या ठेवींमध्ये गुंतवणूक केली जात आहे ही बाब गंभीर असून, बँकांनी पिक कर्जास ज्या ठिकाणी व्याज सवलतीचा लाभ दिला जातो. त्याठिकाणी नियंत्रणाकरीता विशेष योजना राबवावी. त्यामध्ये कर्ज घेण्यापूर्वी छाननी करणे (Pre sanction scrutiny) तसेच कर्ज घेतल्यानंतर योग्य विनियोग पाहणे व तपासणी (post disbursement utilisation inspection & Audit) करण्याची आवश्यकता असून, याबाबतची जबाबदारी संबंधित कर्ज वितरण करणाऱ्या संस्था/बँकांची राहणार आहे.*

*यादृष्टीने मा. जिल्हा उपनिबंधक व विभागीय सहनिबंधक यांनी पिक कर्ज वाटप हे क्षेत्राच्या प्रमाणातच करण्याच्या सूचना सभेमध्ये दिलेल्या आहेत. याबाबत बँकेच्या मा. संचालक मंडळ सभा दि. २७.१२.२०१३ मध्ये झालेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे पिक कर्ज वाटप धोरण निश्चित करण्यात आले आहे.*

१. अल्प मुदत पिक कर्ज मंजूरी, ही शेतकऱ्याच्या धारण क्षेत्रानुसारच दयावयाची असून, कलम बागायतीसाठी लागवडी खालील क्षेत्राचा ७/१२ व अन्य पिकासाठी ८अ क.म. पत्रक करतेवेळी सादर करणे आवश्यक आहे.

२. डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत पिक कर्जास व्याज सवलत मिळणार असल्यामुळे सदर योजनेच्या धोरणास अधिन राहूनच पिक कर्ज वाटप करावे. (भात पिक कर्जाचे वैयक्तिक कर्ज वाटप रू. ३०,०००/- पर्यंत असल्यास लागण दाखल्याची आवश्यकता नाही. मात्र रू. ३०,०००/- वरील मंजूर मर्यादा असल्यास कर्ज वाटप हे दोन टप्प्यात दिले जाईल. पहिल्या टप्प्यात रू. ३०,०००/- पर्यंत कर्ज उचल दिली जाईल. त्यानंतर दुसऱ्या टप्प्याची उचल करताना जर वस्तूरूप स्वरूपात संबंधित सहकारी संस्थेकडून (वि.का.स किंवा खरेदी विक्री संघ) खत अगर बियाणे खरेदी करणार असल्यास त्यासाठी लागण दाखल्याची आवश्यकता नाही. <u>मात्र रोख स्वरूपात उचल असल्यास रू. ३०,०००/-वरील उचलीसाठी इन्स्पेक्टर व संस्था चेअरमन/सचिव यांचा संयुक्तरित्या पाहणी अहवाल दाखला सादर करणे आवश्यक आहे</u>.

३. आंबा पिक कर्ज हे शेतकऱ्याच्या मालकीच्या क्षेत्रातील लागत्या कलमांकरीताच देता येईल. करार पध्दतीसाठी पिक कर्ज देता येणार नाही. (करार पध्दतीने कर्जाची आवश्यकता असल्यास त्यास बँकेच्या व्यवसाईक कर्ज योजनेंतर्गत कर्ज दिले जाईल. त्यास सवलतीचा व्याजदर मिळणार नाही.)

४. शासनाने सर्व पिक कर्ज पुरवठा हा किसान क्रेडीट कार्ड योजनेंतर्गत वितरीत करणेचा निर्णय घेतला असल्याने, यापुढे वस्तूरूप, रोख व एकूण अशी कर्ज मंजूरी न करता एकत्रितरित्या कर्ज मंजूरी केली जाईल. त्याचा उपयोग शेतकरी त्याच्या गरजेनुसार करू शकेल.

५. यापूर्वी ३ वर्षाकरीता क.म. पत्रक तयार करण्यात आली आहेत. सुधारीत पिक कर्ज मर्यादेचा लाभ शेतकऱ्यांना दयावयाचा असल्यास संस्थांनी वरील मुद्दे विचारात घेवून नवीन सुधारीत क.म. पत्रक मुदतीत सादर करावे. क.म. पत्रक बदलले नाही तरी वाटपाचे नियम चालू वर्षीच्या वाटपासाठी आहेत तेच नियम लागू राहतील.

६. देवस्थान इनाम, धरणग्रस्त असलेल्या शेतकऱ्यांच्या क्षेत्राच्या बाबतीत कमाल कर्ज मर्यादा रू. २०,०००/- (अक्षरी रूपये वीस हजार) मात्र आहे, ती तशीच राहील. सदर कर्जाच्या बाबतीत शासनाकडून व्याज सवलतीचा लाभ न मिळाल्यास संपूर्ण कर्ज परतफेड करण्याबाबतचे हमीपत्र संस्था संचालक मंडळ यांचेकडून घेण्यात यावे.

७. वनसंज्ञा लागू असलेल्या क्षेत्राच्या बाबतीत क्षेत्रावर बोजा निर्माण होत असल्यास त्याला अन्य शेतकऱ्यांप्रमाणेच क्षेत्राच्या प्रमाणात कर्ज मंजूर करता येईल.

८. अन्नधान्य व कडधान्य पिकांकरीता वैयक्तिक कमाल कर्ज मर्यादा २ हेक्टर राहील.

९. बागायती पिकांकरीता वैयक्तिक कमाल मर्यादा राहणार नाही. मात्र प्रति कलम कर्ज मर्यादा विचारात घेवून उत्पादनक्षम कलम झाडांच्या प्रमाणात कर्ज मंजूर करता येईल.

१०. बँकेकडून आंबा/काजू पिक हे कर्ज कलम बाग मशागतीसाठी देण्यात येते. फेब्रुवारी ते मे हा आंबा/काजू पीक उत्पादन हंगाम असल्याने आंबा/काजू पीक कर्ज प्रस्ताव प्रधान कार्यालयाकडे सादर करणेचा कालावधी जून ते जानेवारी असेल. त्यामुळे फेब्रुवारी ते मे या कालावधीमध्ये आंबा/काजू पीक मंजूरी दिली जाणार नाही. मात्र कर्ज मंजूरी असल्यास उचल करता येईल.

११. भात पिकासाठी पुरवणी/ वाढीव क. म. पत्रके सादर करणेचा कालावधी

  अ. खरीप हंगाम दि. १ एप्रिल ते ३१ जुलै

  ब. रब्बी हंगाम दि. १ आक्टोबर ते ३१ डिसेंबर

१२. जिल्हयातील शेतकऱ्यांचे वैयक्तिक क्षेत्र कमी आहे किंवा स्वतःच्या नांवे नाही अशा शेतकऱ्यांकरीता तोंडी कराराद्वारे कर्ज दिले जाते. तोंडी कराराने ज्याची जमीन कसवणार आहेत, त्याचे नावे त्याच क्षेत्रावर कर्ज घेतलेले नसावे. सदर कर्ज मर्यादा रू. ५,०००/- आहे. तसेच सद्यस्थितीत चालू असलेली सणासुदीची खावटी कमाल कर्ज मर्यादा रू. ३०००/- यापुढेही चालू राहील.

१३. शेती पुरक खावटी अंतर्गत सन २०१२-१३ पासून रू. २००००/- कमाल कर्ज मर्यादा असून दरवर्षी कर्ज व्याजदरामध्ये ०.५०% वाढ केली जाते. सद्यस्थितीत सन २०१३-१४ मध्ये बँक ते संस्था व्याजदर ८.५% असून सन २०१४-१५ करीता सदरचा व्याजदर ९% राहील. मात्र कमाल कर्ज मर्यादेमध्ये १०% घट करून ती रू. १८,०००/- करण्यात आली आहे. तसेच यापुढे दरवर्षी रू. २०००/- याप्रमाणे कमाल कर्ज मर्यादा कमी करणेत येईल. कर्ज वाटपाबाबतचे धोरण यापूर्वी कळविलेल्या दि. ३०.०४.२०१२ च्या परिपत्रकाप्रमाणेच राहील.

**१४. ऊस पिक कर्ज –**

ऊस पिक कर्जासाठी वैयक्तिक कर्ज मर्यादा ठरविणेत आलेली नाही. ऊस पिकाकरीता लागवडीखालील क्षेत्रानुसार कर्ज मंजूर करण्यात येईल. साखर कारखाना क्षेत्रातील ऊस उत्पादकांनी कारखान्याकडून ऊस लागण दाखले उचलीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांच्या नांवे क्षेत्र नाही. त्यांचेकरीता सदर धोरणामध्ये मा. संचालक मंडळ सभा दि. २६.०७.२०१३ मधील निर्णयानुसार खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

१) जे सभासद दिर्घ मुदत भाडे कराराने क्षेत्र घेवून ऊस लागवड करतात व सदर क्षेत्र कर्जास तारण मिळणारे नसते अशा सभासदांनी साखरकारखान्याकडे ऊस घातल्यास सदरचे ऊस बिल थेट बँकेच्या कर्ज खाती जमा करणे बाबत कारखान्याचे पत्र व लागण दाखला सादर करणेचे अत्रावर जास्तीत जास्त रू १.०० लाख कर्ज मंजूर करता येईल.

२) सदर कर्जास स्थावर मालमत्ता असलेले दोन स्थानिक उस पीक उत्पादक शेतकरी अगर शेतकरी व एक पगारदार नोकर जामिन देणे आवश्यक आहे. कर्जाची थकबाकी झाल्यास स्वतःच्या उत्पन्नातून कर्ज भरणा करणेबाबत जामिनदार यांचे रू १००/- चे बाँड पेपरवरील हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३) सदर कर्जाचा व्याजदर बँक ते संस्था ७% व वैय थेट सभासदाना ९% राहील.

४) जिल्हाबाहेरील व्यक्ती जी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये कराराने जमिन घेवून ऊस शेती करणार आहे अशी व्यक्ती या योजनेसाठी पात्र राहणार नाही. मात्र वरील मुद्दा क्रमांक १४ मधील

मुद्दा क्र. २ ची पुर्तता होत असल्यास लाभार्थीनिहाय कर्ज मंजूरी देण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

५) चार किंवा त्या पेक्षा अधिक शेतकरी सभासद संयुक्त जबाबदारी मंडळ (Joint liability group) स्थापन करून शेती करणार असल्यास कारखान्याकडील लागण दाखला विचारात घेवून, सदर सभासदांना विना तारण प्रत्येकी रू ५०,०००/- पर्यंतची वैयक्तिक कर्ज मर्यादा कर्जफेडीच्या संयुक्त जबाबदारीवर मंजूर करण्यात येईल.

६) ज्या शेतकरी सभासदांचे नावे क्षेत्र आहे असे सभासद शासनाच्या व्याज अनुदान किंवा पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंर्तगत पात्र ठरतात. त्यामुळे स्वतःच्या नांवे क्षेत्र नसलेले सभासद शासनाच्या सदर योजनांना पात्र ठरणार नाहीत. सदर सभासदांच्या बाबतीत नियमित पध्दतीने व्याज आकारणी केली जाईल.

१५. केंद्र शासन व्याज सवलत योजना व राज्य शासन डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत मुदतीत पिक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याज सवलतीचा लाभ मिळणार असल्याने, सदर योजनेंतर्गत शासनाकडून वेळोवेळी कळविले जाणारे निकष व सुधारणा पिक कर्जास लागू राहतील.

सदरचे सुधारीत परिपत्रक शाखेतील सर्व अधिकार/कर्मचारी यांनी एकत्रित वाचन करून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावयाची आहे.